(Barathi)

10.20 / 9/91

1343 — 32 P

No. 1343

(प्रभात फेरी आरती)

# तरुण भारत

Tarun Bharat


# गीतावली.

Gitavli

in Marathi

(2 copies)

प्रथमावृत्ती



कींमत १ आणा

## पद

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
21 NOV. 1930

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1343
Date 11-1-72
GOVT. OF INDIA

[ चाल—बजाव बजाव मुरली ]

चल ऊठ बांधुनी चंग । भारता ॥ फुंक फुंक रणशींग ॥धृ०॥
परक्यांचा आम्हांवरी जाच । हा हुतुतू नंगा नाच ॥
ही अधोगतीची खाच ! भारता । फुंक फुंक रणशींग॥१॥
आम्हांत पाडूनी फूट । मिळविती सदोदित लूट ॥
येइना कधीं त्यातुट । भारता फुंक फुंक रणशींग ॥ २ ॥
तरी आता उघडूनी नयन । भारता पहा न्याहाळून ॥
देशाचा राखाया मान । भारता फुंक फुंक रणशींग ॥ ३ ॥
तरी एक वेळ अवतार । घेउनी भरत भूवर ॥
करी आम्हां वरी उपकार । भारता फुंक फुंक रणशींग ॥४॥
कवि शंकर जोडुनी हात । करीतसे विनंती त्वरीत ॥
जनतेस कराया मुक्त । भारता फुंक फुंक रणशींग ॥ ५ ॥

## ॥ तरुण भारत ॥

# गीतावली.

### पद १ लें

[ चाल—हमारा राम प्यारा है ]

अय मातृभुमि तेरे चरणोंमे शीर नमाऊं ।
मैं भक्ति भेट अपनी तेरी शरणमें लाऊं ॥ धृ० ॥
माथेपै तू हो चंदन, छातीपै तूं हो माला ।
जिव्हापै गीत तू हो, मैं तेरा नाम गाऊं ॥ १ ॥
जिससे सुपूत उपजे गांधी तिलक जैसे ।
उस तेरि धूलिको मै निज शीस पै चढाऊं ॥ २ ॥
मानी समुद्र जिसकी धूलीका पान करके ।
करता है मान तेरा, उस पैरको मनाऊं ॥ ३ ॥
ये देश मानवाले चढकर उतर गये सब ।
गोरे रहे न काले, तुझकोहि एक पाऊं ॥ ४ ॥
सेवामें तेरी सारे भेदों को भूल जाऊं ।
वह पुण्यनाम तेरा प्रतिदिन सुनूं सुनाऊं ॥ ५ ॥

तेरेही काम आऊं, तेराहि मंत्र गाऊं ।
मन और देह तुजपर बलिदान मैं चढाऊं ।। ६ ।।

## पद २ रें

( चाल—भाव धरारे )

उठा सत्वर । बंधुनो बांधा कंबर ।। धृ० ।।
परसत्ता झुगारण्याला । व्हा तयार हो मरण्याला ।।
उठा वेळ अतिशय झाला । उडवा कहर ।।
हा पहा गनीमी कावा । घेई प्रत्येकांचा चावा ।।
तरि बाणा आपुला दावा । अति लवकर ।।
ही वेळ असे बाणिची । तरी विनंति ऐका आमुची ।।
एक जुट करा सर्वांची । जोडीतो कर ।।
ती पुरे झाली झोप । जाहली घराची खोप ।।
तरी स्वातंत्र्याचा दिप । लाउ लौकर ।।
आंग्लाई कराया नष्ट । सांगतो तुम्हाला स्पष्ट ।।
जरी पडतील थोडे कष्ट । रणावर
तरी माघार मुळी ना घेता । लढु चिकाटीनें हो आतां ।।
शत्रुस करू बे पत्ता ।। हाद्दी बाहेर ।।
शत्रुस तोंड देण्याला । नोकरशाही नष्ट करण्याला ।।

धर्म युद्धास्तव मरण्याला । व्हा तयार ॥
आज्ञा हीं माहात्माजींची । कायदेभंग करण्याची ॥
ही वेळ नव्हे क्रांतीची । शांत रहा फार ॥
जरी पडेल मार लाठयांचा । तरी त्यांस मुळी न भिण्याचा ॥
हा निश्चय करा मनाचा । नाहीं डरणार ॥
आपसांत पाडूनी फुट । मळविती सदोदीत लुट ॥
येइना कधी त्या तुट । झाले शिरजोर ॥
शीर जोर पणा हा यांचा । बंधुनो नष्ट करण्याचा ॥
हाच काळ असे विजयाचा । खरोखर ॥

## पद ३ रें

[ चाल--हा नको नको संसार ]

हें असे कसे सरकार । दीना छळणार ॥ धृ० ॥
सत्तेच्या जोराबरती । जनतेस दाखवी भीती ॥
जुलमी हा असे कारभार । दीना छळणार ॥ १ ॥
भल भलतें लादुनी कर । जनतेस करी बेजार ॥
अन्याय करी अनीवार । दीना छळणार ॥ २ ॥

व्यापार कराया आले । परी राजे आज ते झाले ॥
बडिजाव वाढला फार । दीना छळणार ॥ ३ ॥
अघोर कृत्य करातात । अमानूष पणे छळीतात ॥
जनतेची नसे दरकार । दिना छळणार ॥ ४ ॥
सरकार नव्हे सैतान । घालिते सदा थैमान ॥
लुटुनीया नेले घरदार । दिना छळणार ॥ ५ ॥
तरी अशा दुष्ट सरकारा । देऊ नका बंधुनो थारा ॥
हीच विनंती वारंवार । करा निर्धार ॥ धृ० ॥ ६ ॥

## पद ४ थें

चरखा चला चला के । लेंगें स्वराज्य लेंगें ॥ धृ० ॥
मलमल जो है विदेशी । आणे को गज मिलेंगा ॥
खादी महि त्यजोंगे ॥ लेंगे० ॥ १ ॥
बहोत्तिर करोड रुपिया । परदेश जा रहा है ॥
उसकू बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥
चरखेकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
अंग्रेज को सुनाके । लेंगे० ॥ ३ ॥

या हक्क है हमारा । तनजानसेबि प्यारा ॥
मरणें नही डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥
हम सब परेड फौजी । कप्तान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसीकि लेंगे । लेंगे० ॥ ५ ॥
तेहतीस करोड फौजी । रण साथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे । लेंगे० ॥ ६ ॥
चरखा ही तोफ बनेंगे । तकवा बने है बरची ॥
गोलेसे सूत्रके हंम् । लेंगे ॥ ८ ॥

**पद ५ वें**

( चाल–अनंद कंद )

बनीया म्हणोनी आला । धंदा करावयाला ॥
व्यापार वाढवून । लालूच दाखवून ॥
त्याने तुम्हां आम्हांला । नेले रसा तळाला ॥
सशस्त्र दरोडे खोर । नीशस्त्र लोकावर ॥
आवचीत घाली घाला । छळी व्यर्थचि प्रजेला ॥
जुलुमास नाहीं गणली । नाहीच न्याय निति ॥
म्हणतां दयाळु ज्याला । नाहीं दया तयाला ॥
हा हिंद देश अपुला । ब्रिटिशानी फस्त केला ॥
तरी उठा का निजला । जय माहात्मा गांधी बोला ॥

**पद ६ वें**

[ चाल–सुखाचा शोध ]

माहात्मा वीर गांधिचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
उठा व्हा सावध आतां । किती हो झोप तुम्हीं घेतां ॥
नव्हे हा काळ झोपण्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
पुरे ती जाहली झोप । घराची जाहली खोप ॥
आठवा बाणा पुर्वजांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
बंधुनो बांधा कंबर । चला घ्या हातामध्यें शिर ॥
कराया मोड शत्रुचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
देउ नका शेत सारा । आणित्या अवधारा ॥
असे हा मार्ग विजयाचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
आपुल्या संघ शक्तीनें । आणि ईश कृपेनें ॥
करूं या नाश गनीमांचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
असे ही वेळ शांतीची । नाहीं क्रांती करण्याची ॥
लढा हा बिनं शस्त्राचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
सदा सत्य बोलावें । शत्रुसी शांत वागवावें ॥
करावा त्याग असत्याचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥
मर्दांनी बाणा आंगात । यावया करा मेहनत ॥
शिका तो खेळ लाठीचा । ईशारा ऐका शौर्याचा ॥

गिरवा कित्ता पुढाऱ्यांचा । त्यांच्या स्वार्थ त्यागाचा ॥
तुम्हाला अर्ज हा प्रेमाचा । ईषारा ऐका शौर्याचा ॥

### पद ७ वें

[ चाल—मर्द बनो मर्द बनो ]

शांती धरा शांती धरा । स्वस्थ न बसतां कार्य करा ॥
कठीण आली वेळ अती । तरी खुटुन देवू नका मतीं ॥
पुढे सरा पुढे सरा । स्वस्थ न बसतां कार्य करा ॥
पुरे झाली झोप चला ॥ सोडून द्या तरी आळसाला ॥
लाज धरा लाज धरा । स्वस्थ न बसतां कार्य करा ॥
राष्ट्रीय झेंडा घेवूनीया । युद्ध कराया जाऊया ॥
रणी मरा रणी मरा । स्वस्थ न बसतां कार्य करा ॥
हाल्ला करूया जोराचा । जिरवू नांगा गनीमाचा ॥
निरधार करा निधार करा । स्थस्थ न बसतां कार्य करा ॥
शत्रुचा बहु शिरजोर । आहे बंधुनो खरोखर ॥
पहा जरा पहा जरा । आग लागली सर्व घरा ॥
शस्त्र न घेता चिकाटीनें । शत्रुस हाटवु युक्तीनें ॥
मार्ग बरा मार्ग बरा । लढण्याचा हा मार्ग बरा ॥
मारूं अथवा रणी मरू । परी स्वतंत्र देश करूं ॥
हाच करा हाच करा । निश्चय जनहो हाच करा ॥

## पद ८ वें

[ चाल--२ सुखाचा शोध ]

कायदे भंग करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
जुलमी कायदे आता । बंधूनो मोडण्या करितां ॥
उठा हो स्वस्थ कां बसला । चला व्हा तयार मरण्याला ॥
असे हे कृत्य करितांना । येईल चीड ब्रिटीशाना ॥
त्रास देतील आपणाला । तरि व्हा तयार मरण्याला ॥
गोळीबार करतील । शेवटी सुळी देतील ॥
तरी हो भिऊ नका त्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
भ्याड हो उठा लवलाही । मनाची लाज धरा कांहीं ॥
असे का आळसी बनला । चला व्हा तयार मरण्याला ॥
विनवी कवि शंकर । बंधुनो बांधा कंबर ॥
आंग्लाई नष्ट करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥

# पद ९ वें

---

[ चाल–हरहर महादेव बोला ]

अरुणोदय झाला । अजुनी स्वस्थ कसे बसला ॥ धृ० ॥
परसत्ते मधें देश आपुला तिष्ठत हो पडला ॥
तरी बंधुनो चला झडकरी करू मोकळे त्याला ॥ १ ॥
महात्माजींच्या स्वातंत्र्याचा रण संग्रामाला ॥
सहाय्य करूया चला बंधुनो उठा उशिर झाला ॥ २ ॥
होइल जेव्हां माहात्माजींची आज्ञा आपणाला ॥
तेव्हां पासुनी एक जुटीनें लागा कार्याला ॥ ३ ॥
ज्या गनिमांनी आपणा वरती जुलूम चालविला ॥
त्या गनिमांची खोड मोडण्या गांधी अवतरला ॥ ४ ॥
तरी बंधुनो महात्माजींचा घेउ चला सल्ला ॥
जेव्हां करतिल सुचना तेव्हां करु शत्रुवर हल्ला ॥ ५ ॥
ज्या बनियानी धुळी मिळविलें तुम्हां आम्हाला ॥
शंकर कवि म्हणे चला तयाची खोड मोडण्याला ॥ ६ ॥

.............

प्रकाशक—के. डब्ल्यू. आर्यमाने,
२० मांगलवाडी मुंबई, नं. ४


# स्वदेशी वापरून देश स्वतंत्र करा.

स्वदेशी कपडे खरदी करण्याकरितां तायशेटे आणि कंपनीत या. आमचेकडे शुद्ध स्वदेशी खादी व खादीची पालळें लहान मुलांचे सुटस् फ्रॉक्स. तसेंच आमची स्पेशल स्वदेशी "स्वतंत्र भारत कॅप" फारच स्वस्त भावानें विकत मिळतील.

**तायशेटे आणि कंपनी.**

रामजी पुरुषोत्तम चाळ, गिरगांव बॅक रोड,
मुंबई नं. ४


THE BANGALORE KANNADA PRESS,
THAKURDWAR, BOMBAY.